# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.06.2024 वार – रविवार**

---

**ऑलिम्पिकदिन**

क्रीडा क्षेत्रात मुला-मुलींना समान संधी देण्यासाठी राज्य शासन पुढाकार घेईल,अशी ग्वाही राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी दिली. महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्यावतीनं आयोजित केलेल्या ऑलिम्पिक दिनाच्या कार्यक्रमात ते आज पुण्यात बोलत होते. शासनाच्या वतीनं जाहीर करण्यात आलेल्या विविध निर्णयांची माहिती क्रीडा मंत्र्यांनी या वेळी दिली. दरम्यान जागतिक ऑलिम्पिक दिनानिमित्त आज पुण्यात महाराष्ट्र क्रीडा संचलनालयाच्यावतीनं क्रीडा रॅलीचं आयोजन करण्यात आलं.तसंच योगा, जिम्नॅस्टिक, मुष्टियुद्ध, तायक्वांदो, मर्दानी खेळ आदी खेळांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

**विमानतळ**

वायु दलाच्या लोहगाव इथल्या हवाई तळापासून सुमारे १०० मीटर परिघाच्या परिसरात उभ्या राहिलेल्या अनधिकृत बांधकामाचे सर्वेक्षण महापालिका आणि हवाई दल संयुक्तरित्या करत आहे. लोहगाव इथला हवाई तळ वायु दलाच्या दृष्टीनं अतिशय महत्वाचा तळ असून या तळावर सुखोई सारखी लढाऊ विमाने तैनात आहेत. आजूबाजूच्या अनधिकृत बांधकामांचा धोका वायुदलाच्या विमानांच्या उड्डाणांना होऊ लागला आहे. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून या परिसरातील अनधिकृत बांधकामांना आळा घालणं आवश्यक बनलं आहे. या परिसरातील ६० संशयित बांधकामाचं सर्वेक्षण ड्रोन द्वारे करण्याच्या दृष्टीनं नियोजन सुरु आहे.

**कृषीविक्रीकेंद्रबंदी**

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बनावट बियाणं,खतं आणि कीटकनाशकांची विक्री करणा-या पुणे जिल्हयातील १५ कृषी सेवा केंद्रांचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात आला आहे. तर पाच केंद्राचे परवाने निलंबित केले आहेत. शेतक-यांनी अधिकृत परवानाधारक कृषी सेवा केंद्रांमधूनच खतं, बियाणं आणि कीटकनाशकांची खरेदी करावी,तसंच खरेदी करताना पक्के बिल घ्यावं आणि साठेबाजी करून जादा दरानं विक्री होत असल्याचं आढळून आल्यास कृषी विभागाच्या नियंत्रण कक्षाकडं तक्रार करावी, असं आवाहन पुणे जिल्हा कृषी अधिक्षक संजय काचोळे यांनी केलं आहे.

**शेतकरीमार्गदर्शन**

राज्यभर १७ जून ते १ जूलै या कालावधीत कृषी संजिवनी पंधरवडा राबविण्यात येत आहे. याअंतर्गत कृषी विभाग, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा म्हणजे आत्मा अंतर्गत विविध मोहिमांच्या माध्यमातून शेतक-यांना खरीप हंगामात

राबविण्यात येणा-या विविध बाबींचं मार्गदर्शन शेतक-यांच्या बांधावर जाऊन करण्यात येत आहे. पुणे जिल्ह्यातल्या भोर तालुक्यातही मार्गदर्शन देऊन प्रात्याक्षिकं करून दाखविण्यातआली. यावेळी कृषी अधिकारी संजीवनी गायकवाड, विनायक पारठे आदी उपस्थित होते.

**<u>स्त्रीशक्तीसन्मान</u>**

समाजातील वंचित घटकांसाठी कार्यरत असलेल्या स्त्री शक्तीचा सन्मान सुवानिती फाऊंडेशनतर्फे नुकताच पुण्यात करण्यात आला. वृद्धाश्रम, अनाथाश्रम, मतिमंद मुलांचा आश्रम चालविणाऱ्यांचा तसंच शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी कार्य करणाऱ्यांचा सत्कारार्थींमध्ये समावेश होता.

**<u>संतकबीर</u>**

संत कबीर हे संतसाहित्यातील महानायक असून त्यांचे मानवतावादी विचार छत्रपती शाहू महाराज यांनी पुढे नेलं,असं प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांनी केलं. ते पुण्यात फुले-शाहू- आंबेडकर विचारमंचतर्फे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी विश्वपारखी संत कबीर पुरस्कारानं आचार्य रतनलाल सोनग्रा यांचा तर छत्रपती शाहू महाराज पुरस्करानं हनुमंत पपुल यांचा सत्कार सबनीस यांच्या हस्ते करण्यात आला.

**<u>सौरऊर्जानिर्मितीप्रकल्प</u>**

सौरउर्जा मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्यानं साखर कारखान्यांनी सौरउर्जा निर्मिती प्रकल्प राबविण्याबाबत विचार करण्यासंबंधीच्या सूचना साखर आयुक्त डॉक्टर कुणाल खेमनार यांनी दिल्या आहेत.ग्रामीण भागातील साखर कारखाने हे हरित उर्जा तयार करणारे मोठे स्त्रोत आहेत.ग्रीन हायड्रोजन निर्मितीसाठी कारखान्यांना मोठी संधी प्राप्त होणार आहे. हरित उर्जा सौर उर्जेद्वारे तयार केल्यास ती वर्षभर मिळू शकते,असंही कुणाल खेमनार यांनी सांगितलं.

**<u>श्यामाप्रसादमुखर्जीपुण्यतिथी</u>**

पिंपरी-चिंचवड शहर भारतीय जनता पक्षातर्फे डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांच्या प्रतिमेला शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करण्यात आली.मोरवाडी इथल्या भाजपा मध्यवर्ती कार्यालयात हा अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

**<u>बाजारसमिती</u>**

पावसानं दिलेली ओढ आणि उन्हाचा वाढलेला कडाका याचा फटका फळभाज्या बाजाराला बसला असून गेल्या आठवड्याच्या तुलनेत फलभाज्यांची आवक घटली आहे या आठवड्यात पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात जवळपास 75 ते 80 ट्रक एवढी निचांकी आवक झाली. भेंडी, टोमॅटो, हिरवी मिरची,फ्लॉवर,बटाटा, सिमला मिरची,वांगी या सह सर्वच फळभाज्यांचे भाव जवळपास दुपटीने वाढले आहे. पालेभाज्यांचे भावही गगनाला भिडले असून सर्वच पालेभाज्या प्रति जुडी चाळीस ते साठ रुपयांच्या घरात पोहोचले आहेत. फळ बाजारात मागणी वाढल्यानं डाळिंब,पपई आणि चिकू यांचे भाव 20 टक्क्यांपर्यंत वाढले आहे. फुल बाजारात मात्र झेंडूच्या फुलांची दरवाढ वगळता सर्व फुलांचे भाव स्थिर आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश अंशत: ढगाळ राहून पावसाच्या एक दोन हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे. तर घाट विभागात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**